# प्रेसनोट

दिनांक– १२/१२/२०१८.

## पोलीस आयुक्त कार्यालय, नवीमुंबई येथील लिपीकेविरुध्द लाचेची मागणी केल्यावरून गुन्हा दाखल.

दिनांक १२/१२/२०१८ रोजी, पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई येथील लेखा शाखेतील कनिष्ठ श्रेणी लिपीक, **श्रीमती मिनाक्षी रोशन खोब्रागडे वय–३७ वर्षे,** यांच्याविरुध्द यातील तक्रारदार यांच्याकडे ८,०००/– रुपये लाचेची मागणी केल्यावरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याबाबत थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांच्या वडीलांच्या ऑपरेशनचे एम.पी.के.वाय आरोग्य योजना मुंबई येथुन मंजुर होवुन आलेले वैद्यकीय बिल ट्रेझरीमध्ये पाठविण्याकरीता नमुद लोकसेविका यांनी ८,०००/– रुपयांची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई यांचेकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ३०/१०/२०१८ रोजी पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे ८,०००/–रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने, लोकसेविका **मिनाक्षी रोशन खोब्रागडे** यांच्याविरूध्द लाचेची मागणी केल्यावरून सीबीडी पोलीस स्टेशन, नवीमुंबई येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक (संशोधन २०१८) अधिनिय सन १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचा पुढील तपास श्रीमती अश्विनी कुसूरकर, पोलीस निरीक्षक, अेसीबी, नवी मुंबई हया करत असुन त्यांचा संपर्क क्रमांक ८०८२५७१९८१ असा आहे.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :– **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :– **022–25427979**
३) ई–मेल आयडी :– **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :– **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner